# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सोलापूर

जा.क्र.२०२०/मशा./कार्या-४/नै.आ./आरआर-२७४ दिनांक २२/०३/२०२०

## -: जाहिरात :-

राज्यात करोना (कोविड-१९) विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन उद्रेक सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकचे आरोग्य सेवा देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची आवश्यता भासू शकते. त्याची पुर्वतयारी म्हणून जिल्हास्तरावरून शासकीय/निमशासकीय/महापालिका/आर्म फोर्सेस (मेडीकल कॉर्प) मधून सेवानिवृत्त झालेले परंतु, आरोग्य सेवा देण्यास सक्षम असाणाऱ्या डॉक्टर्स, परिचारीका व आरोग्य कर्मचाऱ्यांना स्थानिकस्तरावरून आवाहन करून ऑनलाईन अर्जाव्दारे इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी तयार करणे बाबत शासनाचे निर्देश आहेत.

त्यानुसार शासकीय/निमशासकीय/महापालिका/आर्म फोर्सेस (मेडीकल कॉर्प) मधून सेवानिवृत्त झालेले परंतु, आरोग्य सेवा देण्यास सक्षम असाणाऱ्या डॉक्टर्स, परिचारीका व आरोग्य कर्मचारी या पदासाठी शैक्षणिक पात्रताधारक इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | वैदयकीय अधिकारी | ५० | M.B.B.S /P.G. any Subject /B.A.M.S. |
| २ | परिचारिका (स्टाफ नर्स) | १०० | एस.एस.सी. उतीर्ण, G.N.M कोर्स |
| ३ | आरोग्य कर्मचारी (M.P.W.) | ५० | M.P.W. कोर्स उतीर्ण |

सुचना :-

१) उपरोक्त पदाकरीता दिनांक २३/०३/२०२० रोजी सकाळी १०.०० ते सायं. ६.०० वा. पर्यंत **सामान्य प्रशासन विभाग इंद्रभुवन, सोलापूर महानगरपालिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वेलाईन, सोलापूर येथे अर्ज स्विकारण्यात येतील.** अथवा smcgados@gmail.com या ई मेल आयडीवर pdf मध्ये अर्ज सादर करून शकतील.

२) सदरची पदे ही सोलापूर जिल्हयातील ग्रामीण भाग (जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर), शहरीभाग (जिल्हा शल्यचिकित्सक, सोलापूर ) व सोलापूर महानगरपालिका क्षेत्र (आरोग्य अधिकारी, सोलापूर महानगरपालिका) याचे अधिपत्याखाली सेवा देणेकामी भरण्यात येत आहेत.

३) सदरची पदे **तात्पुरत्या स्वरूपाची आसून, करार पध्दतीने अटी व शर्तीवर शासनाचे पुढील निर्देशानुसार भरण्यात येणार आहेत.**

४) अर्ज स्विकृतीचा अंतिम दि. २७/३/२०२० रोजी सायंकाळी ६.०० वा. पर्यंत राहील.

५) प्राप्त अर्जानुसार इच्छुक उमेदवारांची जिल्हास्तरावर यादी तयार करण्यात येईल. शासनाचे या संबंधाने भविष्यात प्राप्त होणारे निर्देश, सदय स्थितीत उपलब्ध शासन निर्णय इत्यादी बाबी लक्षात घेऊन, करारपध्दतीने तात्पुतरत्या स्वरूपासाठीच्या भरती प्रक्रिये बाबतचा योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

**अटी व शर्ती :-**

१) वयोमर्यादा :- कमाल वयोमर्यादा ही ७० वर्षापेक्षा अधिक नसावी.

२) इच्छुक सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्जासोबत त्यांचा संपुर्ण परिचय पत्र, शैक्षणिक पात्रतेसंबंधी सर्व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती, नोंदणी प्रमाणपत्र, जन्म तारखेचा पुरवा, सेवानिवृत्तीच्या आदेशाची प्रत, सेवा तपशिल, दोन पासपोर्ट साईज फोटो जोडणे आवश्यक आहे.

३) सदरची जाहिरात ही सोलापूर महानगरपालिका यांचे www.solapurcorporation.gov.in, www.solapur.nic.in , या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

४) निवड प्रक्रियेसंबंधीत अधिक चौकशीकरिता डॉ. श्री संतोष नवले, आरोग्य अधिकारी, सोलापूर महानगरपालिका (भ्रमनध्वनी क्र. ९४२२४५७९२६) यांचेशी संपर्क कारावा.

५) उपरोक्त जाहिरात ही महाराष्ट्र शासनाचे वेळोवेळी प्रसारीत होणारे शासन निर्णय, सुचना, आदेशाच्या अधिन राहील. शासनाने दिलेले सुधारित निर्देशानुसार भरती प्रक्रीयेत बदल करण्यात येईल. तसेच संपुर्ण निवड प्रक्रियेचे अधिकार जिल्हाधिकारी सोलापूर यांचे राहतील.

| | | |
|---|---|---|
| सही/xxx | सही/xxx | सही/xxx |
| (प्रकाश वायचळ ) | (दिपक तावरे भा.प्र.से.) | (मिलिंद शंभरकर भा.प्र.से.) |
| **मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर** | **आयुक्त, सोलापूर महानगरपालिका सोलापूर** | **जिल्हाधिकारी सोलापूर** |